# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

(क) **(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धिरज लिंगाडे विलास पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, अरुण लाड, आमश्या पाडवी, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील महिला-मुलींवरील अत्याचार व बेपत्ता होण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली मुजोरी, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर सुडबुध्दीने होणारी कारवाई, लव्हजिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात अपरिमित वाढ झालेली असणे, मा. मुख्यमंत्री यांच्या मतदारसंघातच चोरीच्या व लुटमारीच्या घटना झाल्या असून सदरहू घटनांकडे पोलिसांकडून होत असलेले दुर्लक्ष, समाज माध्यमातून (Social Media) करण्यात येणारी आक्षेपार्ह टिका, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करुनही संबंधिताविरुद्ध अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, सन २०२२ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांच्या प्रकरणांत वाढ झालेली असून त्यावर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, राज्यातील कारागृहात क्षमतेपेक्षा दुप्पट कैदी असणे ही समस्या, जामीन मिळूनही अनेक कैदी कारागृहात असणे, महिलांविषयी अपमानजनक होत असलेली वक्तव्य, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीने आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवण्यापूर्वी पोलिसांनी वारकऱ्यांवर केलेला लाठीचार्ज व

अप्रकाशित प्रत

पालखी सोहळ्यास लागलेले गालबोट, समृध्दी महामार्गावर नियोजनाअभावी होत असलेले अपघात, मरोळ, मुंबई औद्योगिक वसाहतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडपट्टी धारकांना घरे न देता स्थानिक दलालामार्फत घरांची अवैधपणे विक्री करुन बोगस झोपडपट्टी धारकांनी घरांचा ताबा घेऊनही अद्याप कोणती कारवाई करण्यात आलेली नसणे, राज्यातील सुरु असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाकरिता भुसंपादन केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला मिळालेला नसणे, शासन सेवेतील सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या एका वारसास सेवेमध्ये घेण्याची होत असलेली मागणी, तसेच जुनी पेन्शन संदर्भात शासनाची उदासिनता, राज्यात मागासवर्गीय व आदिवासींवर होत असलेला अन्याय व अत्याचार, आदिवासी मुलांचे वाढते कुपोषण, अदिवासींच्या योजनांच्या निधी अन्य विभागाच्या विकासकामांसाठी वळविणे, महागाईत वाढ झाली असून मध्यम वर्गाला त्रासाला सामोरे जावे लागणे, टाटा समूहाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीचा राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला नेमका परिणाम, राज्यात वाढलेली बेरोजगारी, नव्याने आलेल्या माहिती तंत्रज्ञान धोरणांमध्ये राज्यातील अनेक भागांवर अन्याय झाला असून त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता, मुलांना अधिवास प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला विलंब, गीग अर्थव्यवस्थेच्या (Gig Economy) माध्यमातून काम करताना व काम करणाऱ्यांना येणाऱ्या समस्या, सेबीचे निर्बंध असूनही राज्यात दाम दुप्पट करण्याच्या आमिषाने होणारी गुंतवणूक, आर्थिक पाहणीमध्ये ६.८ टक्क्यांची वाढीची फसवी घोषणा, महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा, टॅक्सी कॉर्पोरेशनची घोषणा करुनही अद्याप कार्यवाही करण्याकडे होत असलेला विलंब, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख) (मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३, बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३, गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३, शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३, बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ व गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर**, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री निरंजन डावखरे, प्रविण दटके, अनिकेत तटकरे, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, रामदास आंबटकर,

अस्सुधारित प्रत

रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री निलय नाईक, राजहंस सिंह, रामराव पाटील, रमेशदादा पाटील, वसंत खंडेलवाल, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झाले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ॲन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीकच्या संदर्भात शासनाने झिरो टोलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकतो परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तीची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल

अप्रकाशित

खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचा-यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या संदर्भात वेगवेगळया जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासानाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणा-या वारक-यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांपत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळया जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

(ग) **(गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३, शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३, बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ व गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, विलास पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका झालेल्या नसल्यामुळे वाढता भ्रष्टाचार, मुंबईतील रस्ते, फूटपाथ, उद्याने, पूल, समुद्रकिनारे यांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरणाच्या कामाच्या नावाने जनतेच्या पैशांची सुरु असलेली लुट व त्यामध्ये झालेली अनियमितता, सुशोभीकरण करण्यासाठी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केलेला असणे, पदपथाची व रस्त्यांची कामे अपुर्णावस्थेत असल्याने पावसाळ्यात पाणी साचल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसणे, मुंबई उपनगरातील पिण्याच्या पाणी समस्येवर मात करण्यासाठी समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्प राबविण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, वॉर्डच्या लोकसंख्येप्रमाणे निधीचे वाटप न करणे, मुंबईत साथीच्या रुग्णसंख्येत दुपटीने झालेली वाढ, ठाण्यात विकासाच्या नावाखाली हजारो झाडांची करण्यात आलेली कत्तल, ठाणे शहरातील वाहतुक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलांना नागरिकांचा असलेला विरोध, नैना प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या जमिनी संपादित करुन विकासकांच्या घश्यात टाकण्याचा सुरु असलेला प्रयत्न, एमएमआरडीए अंतर्गत विकासकामांसाठी जमिनी संपादित करताना बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकडे होत असलेले दुर्लक्ष, सततचा पाऊस, गारपीट आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, राज्यात सिंचनाचा अभाव, शेतीमालाला भाव नसल्याने कर्जबाजारीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण, राज्यात दरड कोसळण्याच्या घटनेत झालेली वाढ, प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कक्ष तयार करण्याची आवश्यकता, राज्यावर आज ६ लाख कोटींचे कर्ज असणे, कर्ज फेडायला परत कर्ज आणि व्याज फेडायलाही कर्जच अशी अवस्था राज्याच्या आर्थिक रचनेची झालेली असणे, देशात सर्वाधिक कर भरणारे राज्य म्हणून

अप्रकाशित

महाराष्ट्राचा गौरव असणे, मात्र, महाराष्ट्राच्या वाट्याला फारसा निधी केंद्राकडून दिला जात नसणे, महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्ट्ये पाहिली असता कर्जावरील चक्रवाढ व्याज वाढत चालले असणे, राज्यात कॅन्सर व इतर आजारांच्या प्रमाण वाढले असून त्याकरिता करण्यात येणारे उपचार महाग झाले असणे, सदर उपचाराकरिता रुग्णालयांकडून नागरिकांची लूट होत असल्याने गरीबांची अडचण होत असणे, त्याकरिता धोरण निश्चित करण्याची गरज, टाटा रुग्णालयाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, मुख्यमंत्री सहाय्यता निधी गरिबांना मिळत नसणे, धर्मादाय रुग्णालयात अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना खाटा उपलब्ध न होणे, एम्स च्या धर्तीवर विभागनिहाय रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळण्यासाठी गृहनिर्माण धोरण राबविण्याची आवश्यकता, महारेरामध्ये नोंदणी न करता विकासक नागरिकांची फसवणूक करणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकास करताना विकासकांनी जास्तीच्या झोपडपट्टी दाखवून एफ.एस.आय. वाढवून घेऊन शासनाची केलेली फसवणूक, केंद्र शासनाच्या अखत्यारितीतील जमिनी वरील झोपड्यांचा पुनर्विकास, बी.डी.डी च्या पुनर्विकासास होत असलेला विलंब, बी.डी.डी चाळीची दुरवस्था झाली असून दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(घ) म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३, गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३, शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ व गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) –**

**श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे,** श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, सचिन अहिर, आमश्या पाडवी, नरेंद्र दराडे, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यातील सर्व स्वयंअर्थसहाय्य शाळांना आर.टी.ई. प्रतिपूर्ती शुल्क अर्थसंकल्पामध्ये २०० कोटी रुपये मंजूर केले असणे व त्यापैकी प्रतिपूर्ती शुल्क म्हणून ८४ कोटी रुपये शासनाने दिले असून शासनाकडे त्यापैकी उर्वरित ११६ कोटी रुपये प्रलंबित असून राज्यातील अडचणीत व कर्जबाजारी शाळांना लवकरात लवकर हे देण्याची आवश्यकता, राज्यातील शाळा अडचणीत असणे, कर्जबाजारी असणे, तसेच कोरोना काळात सदर शाळांनी ऑनलाइन शिक्षण दिलेले असून तेव्हापासून राज्यातील ज्या स्वयंअर्थसहाय्य शाळांनी २५% विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेले असणे, प्रतिपूर्तीमध्ये शासनाकडून फक्त

अग्रिम प्रत

शिक्षण शुल्क दिले जात असणे, मात्र पालकांकडून गणवेश व शैक्षणिक साहित्यासाठी आग्रह धरला जात असणे, तसेच अधिकारी देखील शैक्षणिक साहित्य व अन्य गोष्टी संबंधीत विद्यार्थ्यांना द्यावे म्हणून सक्ती करीत असणे, शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्का व्यतिरिक्त गणवेश व शैक्षणिक साहित्यासाठी जादाचा लागणारा निधी उपलब्ध करून अशा शाळांना प्रलंबित प्रतिपूर्ती शुल्क लवकरात लवकर अदा करण्यात यावेत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ड:) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ व बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ] —**

(१) **सर्वश्री रामदास आंबटकर,** सचिन अहिर, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री सुनिल शिंदे, विलास पोतनीस, विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेली आकृती रायझींग सिटी, सार्वजनिक बांधकाम विभाग मैदान, मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर (पूर्व), या ठिकाणी शासकीय कर्मचारी वसाहती बांधण्यात आलेल्या असणे, सदरहू वसाहतीजवळ सुरु असलेल्या Ready-mix concrete Plant मुळे शासकीय वसाहतीमध्ये तसेच वसाहतीमधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरत असणे, धुळीच्या वातावरणामुळे शासकीय वसाहतीमधील रहिवाशांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने आरएमसी प्लांट दुसऱ्या जागेवर स्थलांतर करावयास सांगूनही अद्यापपर्यंत स्थलांतर करण्यात आले नसणे, आरएमसी प्लांटमुळे सतत अवजड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे वर्षभरापूर्वी तयार केलेल्या डांबरी रस्त्यांची दुरावस्था होऊन रस्त्यावर हलकी वाहने चालवीणे धोक्याचे झाले असणे, मानखुर्द लिंक रोड या शासकीय वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्याने बाजूला असलेल्या मॅनग्रोव्हजमुळे वसाहत परिसरात सरपटणाऱ्या प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असणे, घाटकोपर रेल्वे स्थानकापासून ४ कि.मी. च्या अंतरासाठी शासकीय वसाहतीपर्यंत बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांना पायपीट करावी लागत असणे, तसेच पावसाळ्यामध्ये आजुबाजुच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे

अप्रकाशित

अप्रकाशित

साम्राज्य पसरलेले असल्यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी व प्रवाशांना घाणीच्या रस्त्यावरुनच ये-जा करावी लागत असणे, शासकीय वसाहती सभोवताली असलेल्या झोपडपट्टीमुळे येथे वास्तव्यास असलेले गुंड प्रवृत्तीचे लोक/गर्दुल्ले यांच्यामुळे वसाहतीमध्ये ये-जा करणाऱ्या रहिवाशी महिला समवेत छेडछाड, लुटमारीच्या घटना असल्यामुळे शासकीय वसाहतीत वास्तव्यास असलेल्या महिला वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, वसाहतीच्या लगत असलेल्या ओपन स्पेस परिसरात रात्रीच्यावेळी अंधारात दारु पिणारे व नशेची द्रव्ये सेवन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांचा वावर होत असणे, शासकीय वसाहतीत वैद्यकीय सुविधा व रुग्णालय नसल्यामुळे वैद्यकीय सुविधेसाठी परिसर सोडून दोन-तीन किलोमीटर बाहेर यावे लागत असणे, शासकीय वसाहतीत इमारत क्र. ४ ते १० असलेल्या लिफ्ट वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे वसाहतीतील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असणे, लिफ्ट नादुरुस्त झाल्याची तक्रार करुनही लिफ्टची दुरुस्ती करण्यात येत नसणे, इमारत क्र.४ मधील एक लिफ्ट मागच्या पावसाळ्यापासून नादुरुस्त असून अद्याप दुरुस्त झालेली नसणे, सदर शासकीय वसाहतीत स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे वसाहतीत मोठ्या प्रामणात उंदीर आणि डासांचा सुळसुळाट वाढला असून रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, शासकीय वसाहतीत मलनिस्सारण व सांडपाण्यासाठी उभारण्यात आलेल्या पाईपमधून लिकेज होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर परिसरात दुर्गंधी पसरणे, त्यामुळे इमारतीच्या भिंतीला पाणी लागत असल्यामुळे वसाहतीतील इमारतीस धोका निर्माण झाला असणे, शासकीय वसाहतीच्या परिसराला संरक्षण भिंत नसल्यामुळे व सुरक्षारक्षकांची अपुरी संख्या असल्यामुळे वसाहतीत चोरी होण्याच्या घटना घडत असणे, त्यामुळे शासकीय वसाहतीला संरक्षण भिंत लवकरात लवकर बांधणे व पुरेशी सुरक्षारक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक असणे, शासकीय वसाहतीला लागून असलेल्या नाल्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्यामुळे नाल्याची पुर्णपणे स्वच्छता करुन कायमस्वरुपी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्रमांक १८६ या शासकीय इमारतीमधील रहिवाशांनी इमारतीची डागडुजी, इमारतीमधील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता सुरक्षारक्षक नसणे, यासंदर्भात रहिवाशांनी वारंवार विनंती अर्ज सादर करुन सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे रहिवाशांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असणे, शासनाच्या उदासिनतेमुळे येथील रहिवाशी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण

झाले असणे, त्यामुळे उपरोक्त शासकीय वसाहतीच्या इमारतीमधील रहिवाशांच्या मागण्यांची पूर्तता करुन इमारतीची देखभाल, दुरुस्ती, निगराणी व स्वच्छता ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)**

**— [अनुक्रमांक (२) ] —**

(२) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगांव सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता यांचे कार्यकाळात जळगांव जिल्ह्यातील रस्ते व इमारतींच्या निविदांमध्ये झालेला शेकडो कोटींचा गैरव्यवहार, जिल्ह्यातील सा.बा. विभागाच्या मागील दिड वर्षाच्या कालावधीत जवळपास ९५ टक्के निविदा ह्या ५ टक्के वाढीव दराने विशिष्ट कंत्राटदारांना देण्यात येणे, यासाठी अधिक्षक अभियंत्याकडून एका कामासाठी फक्त दोनच विशिष्ट ठेकेदारांना डांबरी हॉट मिक्स प्लॅन्ट पासूनचे अंतराचे प्रमाणपत्र देणेबाबत संबंधीत उप अभियंत्यावर दबाव आणणे, पर्यायाने जिल्ह्यातील सर्वच निविदांमध्ये स्पर्धा न होता दोनच निविदा येणे, सदर निविदा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा वाढीव ५ टक्के दराने येऊन स्विकारल्या जाणे, परिणामी शासनाचे कोट्यवधींचे झालेले नुकसान, सदर अधिक्षक अभियंत्यास नियमबाह्यपणे मागील वर्षी नाशिक येथे असताना जळगांवचा मिळालेला अतिरिक्त पदभार, महिला अधिक्षक अभियंता अर्जित रजेवरुन परत येऊनही पदभार न देणे, जळगांव जिल्ह्यात यांना १२ ते १४ वर्षांचा कालावधी होणे, सन २०१७-१८ मध्ये अधिक्षक अभियंता असतांना जामनेर येथील निविदा सूचना क्र-२१ मध्ये पात्रतेच्या निकषावर अपात्र ठरवत त्याच मक्तेदारांना वाढीव दराने टेंडर नोटीस क्र. २७ नुसार तीच कामे देण्यात येणे, याबाबत झालेली तक्रार या भ्रष्टाचाराबाबत दक्षता व गुण नियंत्रक मंडळ, नाशिक यांचेकडून चौकशी होणे, मात्र अद्यापही अहवाल प्राप्त न झाल्याने कारवाई करण्यास होणारी दिरंगाई, कृष्णा इंटरप्रायझेस, धुळे यांची भडगांव येथील निविदा क्र. ४२, २०२२-२३ काम क्र. ५ पात्र व कमी दराची असतांनाही अपात्र ठरविणे, जास्त दराची निविदा स्विकारणे, मक्तेदारांची बीड कॅपसीटी संपुनही विशिष्ट मक्तेदारांना मर्यादेपेक्षा जास्त निविदा देणे, डांबरी हॉट मिक्स प्लँन्ट पासून जास्त अंतर असतांनाही निविदा मंजूर करणे, जळगांव जिल्ह्यात शासनाचे कोट्यवधी

अप्रसिद्ध प्रत

रुपयांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याप्रकरणी विशेष चौकशी पथक गठीत करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ व गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३)] —**

**(३)** **श्री.कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई विभाग यांच्या कार्यालयातील गलथान आणि गैरकारभारामुळे भ्रष्टाचार बोकाळला असून वारंवार तक्रारी करुनही अनेक प्रकरणांना मान्यता न देणे, शालार्थ आयडी न देणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांना मान्यता न देणे, निवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे व पी. एफ. चे प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, संचमान्यता दुरुस्ती न होणे, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, सह्यांचे अधिकार न दिल्याने शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन थकणे, पी. एफ. खात्यातील विना परतावा पैसे काढण्याचे प्रस्ताव महिनों महिने प्रलंबित ठेवणे, मा.हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पैशाची मागणी करणे, संस्थाचालक, शिक्षक यांना अपमानास्पद वागणूक देणे, सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या शिक्षिका यांच्याकडे पुरस्काराच्या मानांकनासाठी पैशाची मागणी केल्याची लेखी तक्रार संबंधित शिक्षकाने करणे, यामुळे आदर्श शिक्षकांच्या राज्य पुरस्कारांबद्दल विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होणे, वामनराव मुरंजन हायस्कूल, मुलुंड या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पैशाची मागणी करणे, खान शबाना परवीन, उस्मानीया उर्दू हायस्कूल, गोवंडी यांच्याकडे शालार्थ आयडी मिळण्यासाठी पैसे मागण्याची लेखी तक्रार संबंधित शिक्षिकेने करणे, रात्रशाळेतील दुबार शिक्षकांना हजर करून न घेणे, एका शिक्षकाकडून पैसे गोळा करण्यासाठी संबंधित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना फोन करणे, या कथित शिक्षकाच्या फोनचा CDR रिपोर्ट काढून तपासण्याची आवश्यकता असणे, या प्रकरणी शिक्षण उपसंचालक, मुंबई व राज्य शिक्षण आयुक्त यांच्याकडे वारंवार तक्रारी होऊनही अद्याप कारवाई न होणे, खुद्द मा. हायकोर्टाने कडक ताशेरे दिलेले व चॅरिटी कमिशनरने डीरेकगनाईज्ड केलेल्यांमार्फत संस्थाना ब्लॅकमेल करणे, शिक्षकांना खर्चात टाकणे असे प्रकार विभागाच्या

अप्रकाशित

संगनमताने वारंवार घडणे, शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई या कार्यालयातील संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांना तात्काळ पदावरून हटवण्याची आवश्यकता असणे, या गंभीर प्रकरणी शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

**(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (४) ते (६)] —**

**(४)** **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, जयंत आसगावकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहराचा विकास आराखडा ३५ वर्षापूर्वी तयार झाला असून सध्या कागल शहराचा नविन विकास आराखडा दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी प्रसिद्ध होणे, त्यामध्ये अनेक गोरगरिब शेतकऱ्यांच्या शेतीवर चुकीच्या पध्दतीने आरक्षण पडलेले असणे. विकास आराखडा विरोधी कृती समितीने लाक्षणिक उपोषण केल्याने शासनाने डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग पुणे मार्फत ४ सदस्यीय कमिटी नेमणे, या कमिटीने दिनांक २३ ते २५ मे, २०२३ रोजी शेतकऱ्यांच्या हरकतीवर सुनावणी घेणे, तपासणी करुन नगरपालिकेस अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले व या कमिटीने अहवाल नगरपालिकेस दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी सादर करणे, सदर अहवाल व विकास आराखडा नगरपरिषदेमध्ये बॉडी नसल्याने २० जुलैच्या दरम्यान हा विकास आराखडा शासनास सादर करणे ज्यावेळी दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दैनिकांमध्ये कागल शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण होणे, यामध्ये प्रशासकाने मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन काही महत्वाची आरक्षणे वगळली व काही अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतावर आरक्षण टाकणे, काही औद्योगिक कंपन्यांच्या आर्थिक देवाणघेवाणीतून कागलच्या पिण्याचे पाणी असलेल्या जयसिंगराव तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये औद्योगिक झोन तयार करण्यात येणे, या कमिटीकडून आरक्षण उठविण्या करिता मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढालीची चर्चा शेतकऱ्यांमध्ये व मोठया बिल्डरांमध्ये सुरु असणे, अशा चुकीच्या पध्दतीने आर्थिक व्यवहारातून जमिनीची आरक्षणे काढणे व टाकणे, तसेच गडहिंग्लज नगरपरिषदेचा देखील सध्या याच कमिटीकडून विकास आराखडा तयार करण्याचे

अप्रकाशित प्रत

काम चालू असणे, त्यामुळे तिथे देखील चुकीचा विकास आराखडा तयार होण्याचा संभव असणे, त्यामुळे या कमिटीचे व तत्कालीन कागलचे प्रशासक तथा मुख्याधिकारी यांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करून कागल व गडहिंग्लज नगरपरिषदेचा विकास आराखडा रद्द करावा व नव्याने फेरसर्वेक्षण करावे अशी स्थानिक नागरिकांमधून आग्रहाची मागणी होत असणे, परंतु या मागणीकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.विक्रम काळे,** श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय निवासी २८८ आश्रमशाळांना राज्य शासनाने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरु असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, अशी सातत्याने मागणी होत असणे, मराठवाड्याच्या शिक्षक लोकप्रतिनिधिंनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधलेले असणे, तत्कालीन मंत्री महोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करुन अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करुन अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणीनूसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीनुसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

(६) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"म्हाडा प्राधिकरण मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून जवळपास ५० वर्षापूर्वी पाडण्यात आलेली मौलाना आझाद रोड, भंडार वाडा, क्रॉस लेन, गिरगाव येथील इमारत आता खाजगी कंत्राटदार नेमून म्हाडाने नव्याने बांधली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, मात्र सायन येथील प्रतिक्षा नगरातील संक्रमण शिबिरात गेली ५० वर्ष या प्रकल्पातील राहणाऱ्या रहिवाश्यांना अद्याप हक्काचे

घर मिळाले नसून याउलट नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या डागडुजीसाठी आता नव्याने ३० लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याची माहिती उघडकीस येणे, इमारतीमधील रहिवासी वर्गाने म्हाडाकडे आपली मूळ कागदपत्रे जमा केली असणे, मात्र कित्येक वर्ष उलटूनही येथील रहिवाश्यांना आजही संक्रमण शिबिरात राहावे लागत असणे, याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने रहिवाश्यांच्या मनात शासनाविषयी संताप पसरला असल्याने अशा प्रकारे म्हाडाच्या इमारतींच्या होणाऱ्या निकृष्ट कामाबाबत शासनाने सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, सदरहू इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांना तातडीने त्यांची घरे मिळण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : "जेष्ठ साहित्यिक श्री. नामदेव धोंडो महानोर, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव"**

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**(१) उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री** :

**(क)** "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल व सन २०२०-२०२१ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा** : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे

अस्सुधारित प्रत

**वित्त मंत्री** (१) "मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षा अहवाल" तसेच (२) "इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची उपकंपनी दि प्रताप स्पिनिंग, विव्हींग आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपनी मर्यादित, अमळनेर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अनुक्रमे चोपन्नावा व एकशे एकोणीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**चार** : **"विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**पाच** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ व गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) – [अनुक्रमांक (१)] –**

(१) **श्री.विलास पोतनीस, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ९** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

"डोंगर विकास नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत."

**(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (२) व (३)] —**

**(२)** **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १०** वर **शालेय शिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यात ४१७ अनधिकृत शाळा सुरु असल्याबाबत."

**(३)** **श्री.धीरज लिंगाडे,** डॉ.वजाहत मिर्झा, श्री.किरण सरनाईक, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १७** वर **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** निवेदन करतील :-

"संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानाबाबत."

**(४)** **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १६** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

"मुंबईतील शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाबाबत."

**(५)** **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १४** वर **वने मंत्री** निवेदन करतील :-

"मौजे वेळे, ढेण धनगरवाडा, ठोसेघर (ता.जावळी, जि.सातारा) येथील कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्रप्रकल्पाने बाधित झालेल्या रहिवाश्यांच्या पुनर्वसनाबाबत.

**(६)** **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १५** वर **ग्रामविकास मंत्री** निवेदन करतील :-

"अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठ्याचे थकित वीज देयक एम.आय.डी.सी.ने भरण्याबाबत."

**(७)** **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १९** वर **ग्रामविकास मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना नगरपालिका, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन, निवृत्तीवेतन तसेच भविष्य निर्वाह निधी देण्याबाबत."

असुधारित प्रत

**सहा : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.रामराव पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड महानगरपालिकेने शासनाच्या मान्यतेशिवाय महात्मा फुले व्यापारी संकुल व शिवाजीनगर जनता मार्केटची तीन संकुले पीपीपी आणि बीओटी तत्वावर शासनाची पूर्वमान्यता न घेता एकाच विकासकाला देण्यात येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या मूळ निविदेतील प्रिमियम ३५ कोटी असणे, परंतू फेरनिविदेत खाजगी सल्लागाराने फिरविलेल्या सल्ल्यानुसार केवळ १५ कोटी प्रिमियम निश्चित करण्यात येणे, सदर व्यापारी संकुलाच्या निविदा भरणाऱ्या सन्मान बिल्डकॉन या विकासकाने केवळ १० लाख रुपये भागभांडवलाची स्वत:ची जय सन्मान प्रा.लि. ही नवीन कंपनी स्थापन करुन महानगरपालिकेकडून सदर कामाचे कार्यारंभ आदेश मिळवून घेणे, मूळ निविदेपेक्षा अधिक जागेवर वाढीव बांधकामासाठी नव्याने निविदा न काढता सदर काम जय सन्मान प्रा.लि. या मूळ निविदा न भरलेल्या विकासकाला जागेचे कोणतेही मूल्य न आकारता देण्यात येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलातील गाळेधारकांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यासाठी लाखो रुपयांचे काम विकासकाला विनानिविदा देण्यात येणे, संकुलातील गाळेधारकांच्या तात्पुरत्या पुनर्वसनाचे काम विकासकाच्या करारात नमूद नसल्याने त्यांचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड महापानगरपालिकेवर पडणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या कामाला/कराराला शासनाने स्थगिती दिली असताना देखील काम सुरुच ठेवण्यात येणे, तसेच सदर कामाच्या ठिकाणी एका कामगाराचा कोसळून मृत्यू झाला असणे, त्याबाबत महानगरपालिकेने कोणतीही तक्रार न करणे तसेच विकासकावर गुन्हा नोंदविण्यात न येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या जागेची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन न घेता कामास सुरुवात करण्यात येणे, उक्त मार्केटमधील महात्मा फुले मंगल कार्यालयात गोरगरीब कुटुंबातील लग्नसमारंभ कमी शुल्कात/भाड्यामध्ये होत होती, परंतु सदर इमारत विकसित करताना तेथे मंगल कार्यालय वगळून संपूर्ण वाणिज्य वापर करण्यास परवानगी देण्यात येणे, शिवाजीनगर जनता बाजार मार्केटच्या १० हजार चौरस मीटर (१.०७ लाख चौरस फुट) बांधकामाच्या निविदा विकासकाला केवळ एक कोटी रुपयांमध्ये देण्यात आलेली असणे, प्रस्तुत महानगरपालिकेच्या जागेवर अनधिकृतपणे वसलेल्या कुटुंबांना निवासी गाळे (घरे) विकासकामार्फत मोफत बांधून दिली जाणार असणे, नांदेड महानगरपालिकेने महात्मा फुले मंगल कार्यालय व

अप्रकाशित प्रत

व्यापारी संकुल तसेच शिवाजीनगर जनता मार्केट क्र. १, २ व पाठीमागील बाजूचे बांधकाम व पुर्नविकास करण्याचे काम हाती घेताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९ तसेच कलम ७९ (क) मधील परंतुकात नमूद नियमानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नसणे, तसेच वरील सर्व व्यापारी संकुले संबंधित विकासकाला शासनाच्या कोणत्याही कायद्यात अस्तित्वात नसलेल्या ९० वर्षासाठी लिजवर देण्यात येणे, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे तक्रार केल्यानंतरही याप्रकरणी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता सदर कामावरील स्थगिती उठविण्यात येणे, एकीकडे नांदेड महानगरपालिकेने रस्ते, नाल्यांच्या कामातील लोकसहभागाची रक्कम भरण्यासाठी १५० कोटीचे कर्ज घेतले आणि आता ड्रेनेज, रस्ते व पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी ३५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचे प्रस्तावित केलेले असताना दुसरीकडे विकासकाच्या फायद्यासाठी ३५ कोटीचे प्रिमियम १५ कोटी करुन महानगरपालिकेने स्वतःचे २० कोटीचे नुकसान करुन घेणे, तसेच राज्यातील इतरत्र जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात येत असून त्यात मोठ्या प्रमाणात स्पर्धा होत असल्याचे दिसून येत असताना मात्र दुसरीकडे नांदेड महापानगरपालिकेस विकासक मिळत नसल्याचा देखावा करुन एकाच विकासकाला फेरनिविदा काढून कामे देण्यात येत असल्यामुळे या सर्व प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न होत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्यासाठी एसआयटी व एसीबी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

(२) **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे शहरात नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारण्यात येणार असणे, या मेट्रो मार्गाला ठाणे रेल्वे स्थानक व नियोजित नवे ठाणे रेल्वे स्थानकाबरोबर जोडण्यात येणार असणे, या मार्गाचा अद्याप अंतिम आराखडा निश्चित झालेला असणे, परंतु तत्पूर्वी महामेट्रो कंपनीकडून नौपाडा परिसरात होत असलेल्या १८ इमारतींच्या बांधकामांना हरकत घेण्यात येणे, परिणामी वर्षानुवर्षे अधिकृत इमारतीत राहणाऱ्या व आता धोकादायक स्थितीतील इमारतींचा पुर्नविकास रखडला असणे, सध्या नौपाड्यातून जाणाऱ्या अंतर्गत मेट्रोचा मार्ग रेल्वे यार्डखालून नेल्यास इमारतींच्या पुनर्वसनाला अडथळा येणार नसणे, त्याचबरोबर या प्रकल्पाचे काम वेगाने होणार असणे, या यार्डखालून दोन्ही रेल्वे

स्थानकेही सहजपणे जोडता येऊ शकणे, नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्प महामेट्रो कंपनीकडून राबविण्यात येत आहे मात्र, या प्रकल्पाचे काम अजूनही कागदावरच असणे, मुंबई महानगर क्षेत्रात 'एमएमआरडीए' कडून सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असणे, या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील अंतर्गत मेट्रोचे काम पूर्ण होण्यासाठी हा प्रकल्प 'एमएमआरडीए' कडे सोपविण्याची गरज, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **ॲड.अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील माटुंगा रोड रेल्वे स्थानकाजवळ विश्वेश्वरय्या उड्डाणपुलाशेजारी रेल्वेचा भूखंड असणे, सदर भूखंडावर मागील बऱ्याच काळापासून झोपडपट्टी वसलेली असणे, सदर झोपडपट्टी ही रेल्वेच्या नव्हे तर मुंबई मधील पदपथावर असल्याची खोटी माहिती देऊन तत्कालीन महानगरपालिका सहाय्यक आयुक्त जी / उत्तर विभाग व इतर अधिकारी यानी संगनमताने सदर भूखंड गैरमार्गाने विकासकास DCPR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब योजने अंतर्गत विकसित करण्यासाठी दिल्याचे निदर्शनास येणे, सदर गैरप्रकाराबाबत लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त यांचेकडे वारंवार तक्रार केलेली असणे याबाबत अतिरिक्त आयुक्त (शहरे) यांना माहिती प्राप्त झाली असता त्यांच्यामार्फत या कामास दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ मध्ये स्थगिती देण्यात आली असणे, परंतु माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये विकासकाने पालिका प्रशासनाला सोबत घेऊन गैरमार्गाने सदर योजनेचा फायदा घेतल्याचे निदर्शनास येणे, विकासकाने महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन सदर जागी रहात असलेल्या झोपडपट्टी धारकांना नाममात्र रक्कम देऊन त्यांना पुन्हा पदपथावर रहायला भाग पाडले असणे, यामुळे झोपडपट्टी धारकांना त्यांच्या हक्काच्या घरा पासून वंचित रहावे लागत असणे, जेणेकरून मुंबई भकास होण्यास मुंबई महानगरपालिका अधिकारीच जबाबदार असल्याचे निदर्शनास येणे, सदर झोपड्या या महानगरपालिकेचा प्रस्तावित रस्ता अथवा पदपथावर उभारलेल्या नसणे यामुळे या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब प्रमाणे पात्र नसणे, तरीही महानगरपालिकेने गैरमार्गाने सदर योजनेत विकासकाला फायदा मिळवून देण्यासाठी या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब मध्ये समाविष्ट केल्या असणे, सदर बाब

अमुद्रित प्रत

म्हणजे प्रचंड मोठा F.S.I. घोटाळा असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात महानगरपालिका प्रशासनाबाबत निर्माण झालेले भीतीचे वातावरण व शासनाचे होत असलेले नुकसान लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.श्रीकांत भारतीय**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शेतकरी, उद्योजक, विधवा, परितक्त्या, यथास्थिती पूरबाधित, भुकंपग्रस्त, इ. विविध घटकांना शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अनुदान / सवलत / आरक्षण / आर्थिक मदत / सानुग्रह अनुदान देण्यात येत असणे, शासनाच्या या योजनांच्या माध्यमातून राज्यातील अनेक पात्र लाभार्थ्यांना यामुळे अमुल्य लाभ मिळत असणे, तथापि या घटकांपैकी काही घटक हे आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने राज्य शासनाच्या विविध योजनांमधून मिळणाऱ्या लाभ, मदत घेण्यास इच्छुक नसतानाही बहुतांशी वेळा शासनाची मदत, लाभ हे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होत असणे, परिणामी त्यांना सदरहू लाभ, मदत नाकारण्याकरिता सद्य:स्थितीत शासकीय यंत्रणेमध्ये कोणताच पर्याय उपलब्ध नसल्याने इच्छा असतानाही अशा घटकांना शासनाची मदत, लाभ शासनास परत करण्याचा किंवा शासनाची मदत, लाभ नको असल्याबाबत शासनास कळविण्याचा पर्याय सहज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून Give it up LPG Subsidy हा उपक्रम राबविला असता देशातील लाखो नागरिकांनी / घटकांनी या उपक्रमास भरघोस प्रतिसाद देऊन एलपीजी सबसिडीचा त्याग केलेला असणे, याच धर्तीवर राज्य शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून मिळणारा लाभ, मदत स्वेच्छेने सोडू इच्छिणाऱ्या घटकांकरिता / नागरिकांकरिता तसा पर्याय राज्य शासनाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, सदरहू बाब अमलात आणल्यास राज्य शासनाच्या अमूल्य अशा विविध संसाधनांची बचत होवून या संसाधनांचा वापर अन्य लोकोपयोगी कामांसाठी करणे शक्य असणे, समाजहित, देशहिताची अशी भावना मनात ठेवून आजपर्यंत काही लोकप्रतिनिधींनी, सज्ञान नागरिकांनी त्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांच्या लाभाचा, मदतीचा स्वेच्छेने त्याग केलेला असणे, परंतू ही मोहिम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे दृष्टीकोनातून शासनाच्या विविध योजनांद्वारे मिळणारे लाभ, मदत स्वेच्छेने सोडू इच्छिणाऱ्या सज्ञान नागरिकांना असा पर्याय सहज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अमुद्रित प्रत

(५) **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात हेतूपूरस्सर अनियमितता व आर्थिक घोटाळा केल्याचे आढळून येणे, अनुसुचित जाती / नवबौध्द उपयोजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ८१ लाभार्थी तसेच जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटप योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनधिकृतरित्या व नियमबाह्यपणे लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्याशिवाय विशेष घटक योजनेअंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी, पशुपालकांना शासन नियमानुसार शासनाने ४५०००/- इतका दर ठरवून दिलेला असताना, सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये रुपये ४५००० ऐवजी रुपये ६८०००/- नियमबाह्य पध्दतीने शेळी गट खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप केले असल्याचे आढळून येणे, तसेच सदर दोन्ही योजनांतर्गत, सन २०२०-२१ मधील काही लाभार्थ्यांकडून जमा झालेला लाभार्थ्यांचा हिस्सा शासन तिजोरीत जमा न करता, स्वत:जवळ ठेवून लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे खोटे दाखवून शासन निधीचा गैरवापर करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, त्याबाबत लाभार्थ्यांनी व नागरिकांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागवूनही लाभार्थ्यांना, नागरिकांना माहिती देण्यात न येणे, त्यामुळे गोरगरीब व लाभार्थी जनतेमध्ये जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांचा आर्थिक घोटाळा केला असल्याचा संशय निर्माण होणे, परिणामी, लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्येची भावना, याप्रकरणी, शासनाने सविस्तर चौकशी करुन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. अकोला यांचेविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्हा परिषदेने कामगारांच्या पुढील भविष्यासाठी व त्यांच्या हितासाठी कामगार विमा कायद्यांतर्गत प्रत्येक कंत्राटदाराच्या बीलामधून कामगार विम्याची एक टक्का रक्कम उपकर म्हणून वसूल

अप्रकाशित प्रत

करण्यात येत असणे, मात्र शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीचे उल्लंघन करुन एका टक्क्याऐवजी दोन टक्के रक्कम वसूल केली जात असणे, ही वसूल करण्यात आलेली ३७ कोटी २५ लाख ६८ हजार १५१ ही रक्कम मागील तीन वर्षे शासनाकडे जमा केलीच नसल्याचे आढळून येणे, या तीन वर्षातील ३७ कोटी २५ लाख ६८ हजार १५१ इतकी रक्कम जिल्हापरिषदेकडे पडून असल्याने याचा कोणताही फायदा कामगारांना होत नसल्याने आढळून येणे, मागील तीन वर्षात फक्त बांधकाम व ग्रामीण पाणीपुरवठा या दोन विभागामध्ये जर सदरील कामगार विम्याची रक्कम या जिल्हापरिषदेने भरलेली नसेल तर गेल्या १० वर्षातील सर्व विभागातील कामगार विम्याची रक्कम भरली नसल्यास ती १०० कोटींवर असण्याची शक्यता असणे, या जिल्हा परिषदेकडे पडून असलेली कोट्यवधीची ही रक्कम राजकीय हितासाठी वापरली जात असल्याचा आरोप होत असणे, या संशयास्पद व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी कामगार वर्गातून होत असतानाही त्यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी येथील कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना, त्यामुळे गरीब व सर्वसामान्य कामगारांची विम्याची रक्कम त्यांना परत मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांसाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये प्रचंड मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याचे नुकतेच माहे जुलै,२०२३ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे केलेल्या तक्रारी, सदर तक्रारीच्या अनुषंगाने राज्य स्तरीय चौकशी दिनांक ११ मे, २०२३ च्या पत्रानुसार शासनाच्या संबंधित विभागामार्फत कार्यकारी अभियंता यांच्याविरोधात चौकशी लावण्यात येणे, परंतु सदरहू राज्यस्तरीय समिती रद्द करण्यात येऊन दिनांक ३१ मे, २०२३ रोजी प्रधान सचिव कार्यालयाकडून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय नवीन चौकशी समिती स्थापन करण्यात येणे, सदर समितीने निविदा प्रक्रियेसंदर्भात शासनास चुकीचा अहवाल सादर करणे, पूर्वीची राज्यस्तरीय समिती रद्द करुन नविन जिल्हास्तरीय चौकशी समिती सुरु करताना सदर प्रकरणातील कागदपत्रांचा

अग्रिम प्रत

करण्यात आलेला फेरफार, सदर प्रकरणाची चौकशी सुरु असताना राज्यस्तरीय चौकशी समिती बंद करण्याबाबत निर्माण होत असलेली संभ्रमाची भावना, यात भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याची दाट शक्यता, त्याकरिता सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, यातील दोषी आढळून आलेले संबंधित विभागाचे भ्रष्ट अधिकारी कार्यकारी अभियंता यांची सखोल चौकशी करुन तात्काळ निलंबित करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री अंबादास दानवे,** अभिजित वंजारी, सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, विलास पोतनीस, सचिन अहिर, किशोर दराडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, सुनिल शिंदे, कपिल पाटील, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.किरण सरनाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"समृद्धी महामार्गावरील अपघाताच्या प्रमाणात प्रचंड वाढ झालेली असणे, त्यातच मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे समृध्दी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम सुरु असताना गर्डर कोसळून झालेल्या अपघातात पाच इंजिनियरसह एकूण २० जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाल्याची बाब निदर्शनास आली असणे, सदरहू काम करणाऱ्या नवयुगा इंजिनियरिंग कंपनीचे स्थानिक कॉन्ट्रॅक्टर आणि गर्डर लाँच करणाऱ्या व्ही.एस.एल. कंपनीच्या कॉन्ट्रॅक्टरच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणामुळे कामगारांचा मृत्यू झालेला असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ सदरहू कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन मृत व जखमी कामगारांना मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील १३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाचे काम करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, नागपूर ते गोवा हा रस्ता शक्तिपीठ महामार्गाने जोडला जाणार असणे, विदर्भ,

अप्रकाशित प्रत

मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र ते गोवा अशा जाणाऱ्या रस्त्यामुळे १३ जिल्ह्यातील अनेक गावांना त्याचा दळणवळणासाठी फायदा होणे, राज्य रस्ता विकास महामंडळाने प्रस्तावित केलेला हा मार्ग अद्याप पर्यंत कार्यान्वित न होणे, सदरील रस्ता कोणत्या जिल्ह्यातून, कोणत्या विभागातून, कोणत्या गावांना जोडणार आहे याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही गोष्ट शासनाच्या वतीने स्पष्ट न होणे, तसेच यासाठी आवश्यक असणारे भूसंपादन निधी याबाबत जनता अनभिज्ञ असणे, निधी उपलब्धता, विविध विभागाच्या परवानग्याबाबत माहिती मराठवाड्यातील बांधकाम विभागाकडे माहिती नसणे, शक्तीपीठांना जोडणारा हा रस्ता लवकर कार्यान्वित व्हावा अशी मागणी जनतेतून होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे. (जोडपत्र पहावे.)**

**सात : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**आठ : संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविण्यासंबंधी महसुल व पशुसंवर्धन, दुग्धविकास मंत्र्यांचा प्रस्ताव –**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" यावर विचार करण्यासाठी दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यन्त वाढविण्यात यावी."

**नऊ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यात मुंबईसह कोकण, पुणे, रायगड इत्यादी जिल्ह्यात असलेल्या शासकीय विश्रामगृहांची दुरावस्था झाली असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील मंत्री, केंद्र आणि राज्याचे अतिथी, विधीमंडळ समित्यांचे सदस्य, खासदार व आमदार व राज्य शासनाचे अधिकारी यांच्याकरिता निवासाची स्वस्त व सुरक्षित सोय उपलब्ध व्हावी याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहांची व्यवस्था असणे, प्रत्यक्षात विश्रामगृहांचा वापर संबंधितांपेक्षा कंत्राटदार, मंत्री आमदारांचे खाजगी कार्यकर्ते यांच्याकडून होत असल्याचे निदर्शनास येत असणे, या विश्रामगृहांच्या साफ सफाई व सुशोभिकरणाकरिता तसेच वीज, पाणी व सुरक्षा याकरिता वर्षाकाठी लाखांवर खर्च होत असल्याचे निदर्शनास येणे, मात्र या विश्रामगृहांचा वापर योग्यरीतीने होत नसल्याने विश्रामगृहात राहण्यासाठी येणाऱ्या अधिकृत व्यक्तींची गैरसोय होत असून आरक्षणाशिवाय इतर व्यक्तींना खोल्या दिल्या जात असल्याने व गरजूंपेक्षा इतर व्यक्ती या विश्रामगृहांचा वापर करित असल्याने विश्रामगृहांची मोडतोड व दुरावस्था आढळून येणे, विश्रामगृहांच्या सोयी-सुविधांसाठी निधी उपलब्ध असूनही देखभाल व स्वच्छता ठेवण्यात येत नसल्याचे निदर्शनास येणे, काही विश्रामगृहांच्या इमारती अत्यंत मोडकळीस आलेल्या व जीर्ण झाल्या असल्याने त्यांचे ऑडीट करुन पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने गांभीर्याने घेऊन व विशिष्ट नियमावली करुन कठोर धोरण आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**दहा : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन

विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ – लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, ॲड.अनिल परब, श्री अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ – लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ख) विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३"

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० – महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरीता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३"

**(३)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – किटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३"

**(४)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ – बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३"

**(५)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ – अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३"

**(६)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार,

अस्थायी प्रत

धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३"

---

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**अकरा : अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

**(१) डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५५**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत आहे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण झाली आहे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६०**

"मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व

अग्रिम प्रत

त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) **श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४९**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**"राष्ट्रगीत."**

अग्रिम प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ ऑगस्ट, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत